बृहन्मुंबई दूध योजनेमार्फत आरे शक्ती
गाय दूध (३.८ फॅट व ८.५ एसएनएफ)
खरेदी - विक्री करण्यास मान्यता ...

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांकः एमएलके २०१३ /प्र.क्र. ९८/ पदुम ८
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२
तारीख: १५ ऑक्टोबर, २०१६

वाचा :

१) आयुक्त दुग्धव्यवसाय यांचे पत्र क्र. आदुवि-२१/दूध संकलन/वितरणवाढ उपाययोजना (बिझनेस प्लॅन)/२०१६, दि.६.१०.२०१६

२) दि.१०.१०.२०१६ रोजीच्या प्रदत्त समितीच्या बैठकीचे इतिवृत्त

**प्रस्तावना :**

बृहन्मुंबई दूध योजनेतील वितरणात वाढ करणेसाठी तसेच मुंबई येथे दूध आणण्यासाठी होत असलेल्या वाहतूकीच्या खर्चात कपात करण्याच्या दृष्टीने मुंबई जवळील नाशिक व पुणे विभागातील सहकारी दूध संघांकडून बृहन्मुंबई दूध योजनेसाठी स्थळ पोहोच दूध खरेदी दर प्राप्त होण्याच्या अनुषंगाने आयुक्त दुग्धव्यवसाय यांनी ३.८/८.५ या गुणप्रतीचे कच्चे गाय दुधासाठी दरपत्रके मागविली होती. सदर दरपत्रकानुसार गायीचे दूध खरेदी व विक्री दर निश्चित करणे व विक्री कमिशन निश्चित करण्याचा प्रस्ताव दि.१०.१०.२०१६ रोजीच्या प्रदत्त समितीच्या बैठकीत आयुक्त दुग्धव्यवसाय तथा प्रदत्त समिती यांनी सादर केला होता. प्राप्त दरपत्रकानुसार श्रीरामपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी संघ,बाभळेश्वर जि.अहमदनगर यांचे दर दुधाच्या पुष्टकाळासाठी रु.२७/- प्र.लि. व कृशकाळासाठी रु.२८/- प्र.लि. व प्रति पॉईंट फॅट वाढीसाठी ३० पैसे प्र.लि. असे न्यूनत्तम प्राप्त झाल्याचे सदर बैठकीत स्पष्ट करण्यात आले. त्यानुसार सदर दूध खरेदी व विक्री आणि विक्री कमिशन दर निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u> :**

शासन या निर्णयान्वये ३.८ /८.५ या गुणप्रतीचे कच्चे थंड गाय दूध दुधाच्या पुष्टकाळासाठी रु.२७/- प्र.लि. व कृशकाळासाठी रु.२८/- प्र.लि. व प्रति पॉईंट फॅट वाढीसाठी ३० पैसे प्र.लि. या दराने बृहन्मुंबई दूध योजनेसाठी आवश्यकतेनुसार दूध खरेदी करण्यास मान्यता देत आहे. तसेच श्रीरामपूर जिल्हा दूध संघाकडून पुरेशा प्रमाणात दूध उपलब्ध न झाल्यास दरपत्रक प्रक्रियेत सहभागी अन्य संघांकडून वरील दराने दूध खरेदी करणे व त्यांच्याकडूनही उपलब्ध न झाल्यास राज्यातील इतर सहकारी संघांकडून वरील दराने दूध खरेदी करण्यास मान्यता देत आहे.

उपरोक्तप्रमाणे खरेदी केलेल्या दुधाची विक्री "आरे शक्ती गाय दूध" या नावाने बृहन्मुंबई दूध योजनेतून करण्यात यावी. सदर दूध विक्री करीता रु.३.५० प्रति लिटर दूध विक्री कमिशन देण्यासही शासन या निर्णयान्वये मान्यता देत आहे.

हे आदेश शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

हे आदेश प्रदत्त समितीच्या दिनांक १०.१०.२०१६ रोजीच्या बैठकीत शिफारस केल्यानुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६१०१५१२१८२५८२०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ravindra
Vasantrao
Gurav

(र.व.गुरव)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
२. मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव
३. मा.(सर्व) मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव / स्वीय सहायक
४. प्रधान सचिव (वित्त ), मंत्रालय, मुंबई
५. सचिव (सहकार), मंत्रालय, मुंबई
६. आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास, महाराष्ट्र राज्य, वरळी, मुंबई
७. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
८. आयुक्त, पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे
९. सर्व विभागीय आयुक्त
१०. सर्व जिल्हाधिकारी
११. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ मर्या., गोरेगांव, मुंबई
१२. महाव्यवस्थापक, बृहन्मुंबई दूध योजना, वरळी, मुंबई ४०० १८
१३. प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी, पुणे/ नागपूर / मुंबई / औरंगाबाद /नाशिक / अमरावती
१४. सर्व जिल्हा दुग्धविकास अधिकारी
१५. सर्व महाव्यवस्थापक / व्यवस्थापक, शासकीय दूध योजना
१६. महालेखापाल १ /२, महाराष्ट्र (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा) मुंबई / नागपूर
१७. अधिदान व लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई
१८. निवासी लेखा अधिकारी, मुंबई
१९. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
२०. वित्त विभाग (व्यय २)
२१. सर्व कार्यासने (पदुम विभाग)
२२. निवडनस्ती.